**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

# महाराष्ट्र अभियांत्रिकी (स्थापत्य) सेवा(मुख्य) परीक्षा- २०१५- अंतिम निकाल

**(जाहिरात क्रमांक १२८/२०१५व अधिसूचना क्रमांक १४३ /२०१५)**

**घोषणा**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक ९ व १० जानेवारी,२०१६ रोजी घेण्यात आलेल्या **महाराष्ट्र अभियांत्रिकी (स्थापत्य) सेवा(मुख्य) परीक्षा-** २०१५चा अंतिम निकाल, उमेदवारांनी अर्जात केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने त्यांची तपासणी शासन स्तरावर मूळ प्रमाणपत्रावरुन तपासण्याच्या अधीन राहून दिनांक १४ सप्टेंबर, २०१६ रोजी जाहीर करण्यात आला आहे. प्रस्तुत परीक्षेमधून नागपूर जिल्ह्यामधील **श्री.यंबल रोशन प्रमोद** (बैठक क्रमांक –NG002055) हे राज्यात प्रथम आले आहेत. सोलापूर जिल्ह्यातील **श्री. होनमुटे सौरभ विजयकुमार**(बैठक क्रमांक–-PN001290) हे मागासवर्गीयांमधून व पुणे जिल्ह्यातील **श्रीमती धायतडक मोनिका म्हातारदेव** (बैठक क्रमांक-PN002398) हया महिलांमधून प्रथम आल्या आहेत.

२. प्रस्तुत परीक्षेचा निकाल **T.A No.२/२०१६, T.A No.३/२०१६**व **मूळ अर्ज क्रमांक २३२/२०१६** न्यायिक प्रकरणावरील अंतरिम आदेश विचारात घेवून ३ मूळ अर्ज धारकांकरिता सार्वजनिक बांधकाम विभागातील, सहायक अभियंता, ,गट-अ श्रेणी -१ मधील अमागास (महिला) या वर्गवारीलतील ३पदे, सहायक अभियंता, ,गट-ब, श्रेणी-२ मधील अमागास (महिला) वर्गवारीतील ३ पदे व सहायक अभियंता, गट- ब, श्रेणी -२ मधील खेळाडू वर्गवारीतील १ पद, अशी ७ पदे रिक्त ठेवण्यात आली आहेत. प्रस्तुत अंतिम निकाल सदर प्रकरणी होणा-या अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून प्रसिध्द करण्यात येत आहे.

३. शिफारसपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या यादया आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

४. प्रस्तुत अंतिम निकालात अर्हताप्राप्त/ शिफारसपात्र न ठरलेल्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे, अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलवर पाठविल्याच्या दिनांकापासून १० दिवसात आयोगाकडे Online पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. (कृपया आयोगाच्या वेबसाईटवरील ‘उमेदवारांना सर्वसाधारण सूचना” मधील सूचना क्रमांक ३.८पहावी.)

दिनांक : १४ सप्टेंबर, २०१६
ठिकाण : मुंबई

**विजया पडते**
उपसचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई